14 JUL 2026
पुढारी

# प्रा. एन. डी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात उद्या व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्यासनाच्या वतीने प्रा. एन. डी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त 'प्रा. एन. डी. पाटील आणि सामाजिक चळवळी' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी (दि. १५) सकाळी ११.३० वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात व्याख्यान होईल. ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ (सातारा) प्रमुख वक्ते आहेत. यावेळी शाहीर रंगराव पाटील (कोल्हापूर) यांचे शाहिरी सादरीकरण होणार आहे. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव असतील. कार्यक्रमास डॉ. सरोज पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. व्याख्यानाला उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. रणधीर शिंदे आणि डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले आहे.

14 JUL 2026
तरूण भारत

# प्रा. एन. डी. पाटील जयंती; उद्या विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्यासनाच्या वतीने स्व. प्रा. एन. डी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त प्रा. एन. डी. पाटील आणि सामाजिक चळवळी यावर व्याख्यान आयोजित केले आहे. बुधवारी १५ रोजी सकाळी ११.३० वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात व्याख्यान होणार आहे.

कार्यक्रमाला ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ (सातारा) प्रमुख वक्ते आहेत. शाहीर रंगराव पाटील (कोल्हापूर) यांचे शाहिरी सादरीकरण होणार आहे. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आहेत. कार्यक्रमास डॉ. सरोज (माई) पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती आहे. कार्यक्रमाला नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्यासनाचे समन्वयक प्रा. रणधीर शिंदे आणि डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले आहे.

14 JUL 2026

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठात उद्या व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्यासनाच्या वतीने प्रा. एन. डी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त "प्रा. एन. डी. पाटील आणि सामाजिक चळवळी" या विषयावरील विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या बुधवारी (१५ रोजी) सकाळी ११.३० वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात व्याख्यान होईल. ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ (सातारा) हे प्रमुख वक्ते आहेत, तर शाहिर रंगराव पाटील (कोल्हापूर) यांचे शाहीरी सादरीकरण होणार आहे. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव असतील.डॉ. सरोज पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती आहे.

1 4 JUL 2026

सकाळ

# विद्यापीठात उद्या किशोर बेडकिहाळ यांचे व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्यासनातर्फे ज्येष्ठ विचारवंत प्रा. एन. डी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी (ता. १५) सकाळी साडेअकरा वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांचे व्याख्यान होणार आहे. 'प्रा. एन. डी. पाटील आणि सामाजिक चळवळी' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. शाहीर रंगराव पाटील हे शाहिरी सादरीकरण करणार आहेत. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, तर डॉ. सरोज (माई) पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित असणार आहेत, अशी माहिती अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

14 JUL 2026

तरूण भारत

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प्रा. आर. जी. सोनकवडे यांची माहिती; प्रकल्पांतर्गत उल्लेखनीय कार्याची दखल

# विद्यापीठाच्या 'स्तुती'ला 'व्हेरी गुड'शेरा

**केंद्राच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या अर्थसहाय्याने शिवाजी विद्यापीठात राबवलेला 'स्तुती' प्रकल्प नुकताच यशस्वीरित्या पूर्ण झाला आहे. विद्यापीठाने प्रकल्पांतर्गत केलेल्या या उल्लेखनीय कार्याची विशेष दखल घेण्यात असून विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या 'स्तुती सल्लागार समिती'ने प्रकल्प पूर्तता अहवाल आणि इतर कागदपत्रांचे परीक्षण करून या प्रकल्पाला 'व्हेरी गुड' असा शेरा दिला आहे. विद्यापीठासाठी हा अभिमानाचा आणि ऐतिहासिक क्षण आहे.**



**त. भा. प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** देशभरातील उपलब्ध विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या अत्याधुनिक पायाभूत सुविधांचा सर्वांसाठी खुला वापर करून मानवी संसाधने आणि त्यांच्या ज्ञानाची क्षमता विकसित करणे, हा 'स्तुती'चा मुख्य उद्देश होता. त्याअंतर्गत देशभरातील संशोधकांना अत्याधुनिक उपकरणांचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण आणि या सुविधांचा पारदर्शक वापर सुनिश्चित करण्यावर विशेष भर देण्यात आला. या प्रकल्पांतर्गत देशभरात २२ प्रशिक्षण कार्यक्रम घेतले. त्यांपैकी ४ कार्यक्रम शिवाजी विद्यापीठात आयोजित केले होते. तर उर्वरित कार्यक्रम अन्य राज्यातील विविध विद्यापीठात घेण्यात आले. या प्रशिक्षणांमध्ये विविध राज्यांतील १०५० संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यामध्ये भौतिक विज्ञानमधील ३१३, जीवन विज्ञानमधील २९०, रासायनिक विज्ञान मधील २७२, अभियांत्रिकी विज्ञानमधील १३८, पृथ्वी विज्ञान मधील २६ आणि गणितीय विज्ञान मधील ११ प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करण्यासाठी १४ हून अधिक कार्यक्रम घेण्यात आले.

या प्रकल्पासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाकडून निधी मंजूर केला आहे. अंतिम टप्प्यातील ३८ लाख ३६ हजार ९४५ रूपयांचा निधी नुकताच विद्यापीठाला प्राप्त झाला. सुमारे २ कोटी १८ लाख ५५ हजार ४८४ रूपयांचा हा प्रकल्प अधिकृतपणे पूर्ण केला आहे. प्रकल्पाचे समन्वयक म्हणून प्रा. आर. जी. सोनकवडे व उपसमन्वयक डॉ. तुकाराम डोंगळे आणि डॉ. किरण पवार यांनी धुरा सांभाळली. प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी वरिष्ठ प्रकल्प सहयोगी डॉ. मकसूद, वाईकर, सहयोगी टीमचे अजित कांबळे, विजया इंगळे, आदिती गर्गे, सुप्रिया साठे आणि गायत्री पवार यांनी योगदान दिले.

प्रकल्पासाठी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. कुलगुरू प्रा. आर. के. कामत, प्र-कुलगुरू प्रा. ज्योती जाधव यांनी संपूर्ण टीमचे प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल अभिनंदन केले.

### उपक्रमामुळे विद्यापीठाचा लौकिक

**प्रकल्पाचे समन्वयक प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी देशभरात विविध ठिकाणी व्याख्याने दिली. त्यातून विश्लेषणासाठी भारतातून विद्यापीठाकडे तपासणीसाठी येणाऱ्या नमुन्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. या उपक्रमामुळे देशभरातील संशोधकांना शिवाजी विद्यापीठात उपलब्ध अत्याधुनिक वैज्ञानिक उपकरणांची माहिती मिळाली आहे.**

14 JUL 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा 'स्तुती' प्रकल्प ठरला 'व्हेरी गुड'

## केंद्र सरकारच्या विज्ञान-तंत्रज्ञान विभागाचा शेरा; २ कोटी १८ लाखांचा निधी

कोल्हापूर, ता. १३ : केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या (डीएसटी) अर्थसाहाय्याने शिवाजी विद्यापीठात राबविण्यात आलेल्या 'स्तुती' (वैज्ञानिक व तांत्रिक पायाभूत सुविधांचा समन्वित प्रशिक्षण कार्यक्रम) प्रकल्पाला डीएसटीच्या स्तुती सल्लागार समितीने व्हेरी गुड, असा शेरा दिला आहे.

या प्रकल्पाचा अंतिम टप्प्यातील ३८ लाख ३७ हजार रुपयांचा निधी विद्यापीठाला प्राप्त झाल्याने सुमारे २ कोटी १८ लाख रुपयांचा हा प्रकल्प अधिकृतपणे पूर्ण झाला आहे. त्याचे समन्वय प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी केले.

या प्रकल्पाचा उद्देश देशातील संशोधकांना अत्याधुनिक वैज्ञानिक उपकरणांचे प्रशिक्षण देणे आणि संशोधनासाठी उपलब्ध सुविधा सर्वांसाठी खुल्या करणे असा होता. प्रकल्पांतर्गत देशभरात २२ प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले. त्यापैकी चार कार्यक्रम शिवाजी विद्यापीठात, तर उर्वरित विविध केंद्रीय संस्था, आयआयटी आणि नामांकित विद्यापीठांमध्ये झाले. या कार्यक्रमांमध्ये १ हजार ५० संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

एक्सआरडी, टीईएम, एएफएम आणि एक्सपीएस या अत्याधुनिक उपकरणांवर देशभर व्याख्याने दिल्यामुळे नमुन्यांच्या विश्लेषणासाठी विद्यापीठाकडे येणाऱ्या नमुन्यांची संख्या वाढली आहे. विद्यापीठाच्या महसुलातही भर पडली असल्याचे प्रा. सोनकवडे यांनी सांगितले. या प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीत उपसमन्वयक डॉ. तुकाराम डोंगळे, किरण पवार यांनी योगदान दिले.

14 JUL 2026


जनप्रवास

# डीएसटीकडून शिवाजी विद्यापीठाच्या 'स्तुती' प्रकल्पाला 'व्हेरी गुड' शेरा

**जनप्रवास : कोल्हापूर**

भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या अर्थसहाय्याने शिवाजी विद्यापीठात राबविण्यात आलेला 'स्तुती' प्रकल्प नुकताच अत्यंत यशस्वीरित्या पूर्ण झाला आहे. देशभरातील उपलब्ध विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या अत्याधुनिक पायाभूत सुविधांचा सर्वांसाठी खुला वापर करून मानवी संसाधने आणि त्यांच्या ज्ञानाची क्षमता विकसित करणे, हा या 'स्तुती' कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. याअंतर्गत देशभरातील संशोधकांना अत्याधुनिक उपकरणांचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देणे आणि या सुविधांचा पारदर्शक वापर सुनिश्चित करणे यावर विशेष भर देण्यात आला.

या प्रकल्पांतर्गत देशभरात विविध उपक्रमांचे अत्यंत प्रभावीपणे आयोजन करण्यात आले. संपूर्ण देशभरात एकूण २२ प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले. या २२ कार्यक्रमांपैकी ४ कार्यक्रम शिवाजी विद्यापीठात



आयोजित करण्यात आले होते, तर उर्वरित कार्यक्रम देशातील विविध प्रतिष्ठित केंद्रीय, आयआयटीज, राज्य विद्यापीठे व संस्थांमध्ये आयोजित केले गेले. या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये विविध राज्यांमधील तब्बल १०५० संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या प्रकल्पाचे समन्वयक प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी देशभरात विविध ठिकाणी व्याख्याने देण्यासाठी निमंत्रित केले होते.

नमुन्यांच्या विश्लेषणासाठी संपूर्ण भारतातून शिवाजी विद्यापीठाकडे तपासणीसाठी येणाऱ्या नमुन्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली, ज्यामुळे विद्यापीठाच्या महसुलातही लक्षणीय भर पडली आहे. तसेच, देशभरातील संशोधकांना शिवाजी विद्यापीठात उपलब्ध असलेल्या प्रगत वैज्ञानिक उपकरणांची सविस्तर माहिती मिळाली असून, त्यांच्यात याविषयी मोठी जागरूकता निर्माण झाली आहे.

विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या 'स्तुती सल्लागार समिती'ने प्रकल्प पूर्तता अहवाल आणि इतर कागदपत्रांचे परीक्षण करून या प्रकल्पाला 'व्हेरी गुड' असा अत्यंत गौरवास्पद शेरा दिला आहे. देशभरात या स्तरावर काम करूनडीएसटीकडून अशी शाबासकी मिळवणे, हा खऱ्या अर्थाने शिवाजी विद्यापीठासाठी एक अत्यंत अभिमानाचा आणि ऐतिहासिक क्षण आहे.

शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. तसेच कुलगुरू प्रा. आर. के. कामत, प्र-कुलगुरू प्रा. जे. पी. जाधव यांनी संपूर्ण टीमचे अभिनंदन केले.

1 4 JUL 2026
पुढारी



कोल्हापूर : स्मृतिशेष प्रा. डॉ. जे. बी. शिंदे यांच्या 'संत तुकारामांची आक्रोशगाथा' आणि 'एज्युकेशनल थॉटस् अँड वर्क ऑफ शाहू महाराज' या दोन ग्रंथांचे प्रकाशन करताना डावीकडून विशाखा जितकर, डॉ. सुभाष देसाई, सुरेश शिंदे, डॉ. रणधीर शिंदे, श्रीराम पचिंद्रे, डॉ. भगवान हिर्डेकर, डॉ. रमेश जाधव, डॉ. जी. पी. माळी.

# डॉ. जे. बी. शिंदे यांच्या दोन ग्रंथांचे प्रकाशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

स्मृतिशेष प्रा. डॉ. जे. बी. शिंदे यांच्या 'संत तुकारामांची आक्रोशगाथा' आणि 'एज्युकेशनल थॉटस् अँड वर्क ऑफ शाहू महाराज' या दोन ग्रंथांचे प्रकाशन नुकतेच घाटगे हॉल, देवल क्लब येथे मान्यवरांच्या हस्ते झाले.

शिक्षणतज्ज्ञ डॉ. भगवान हिर्डेकर आणि शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे हे प्रमुख पाहुणे होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार, लेखक, कवी श्रीराम पचिंद्रे हे होते.

सामाजिक समता आणि शोषणाविरुद्ध लढा हे महापुरुषांच्या साऱ्या विचार आणि कार्याचे सूत्र होते. ज्ञान, समाजप्रबोधन आणि परिवर्तनवादी विचार हेच महापुरुषांचे कार्य डॉ. जे. बी. शिंदे यांनी समर्थपणे पुढे नेले, असे श्रीराम पचिंद्रे म्हणाले.

'संत तुकारामांची आक्रोशगाथा' या ग्रंथाविषयी डॉ. रणधीर शिंदे यांनी, तर 'एज्युकेशनल थॉटस् अँड वर्क ऑफ शाहू महाराज' या ग्रंथाविषयी डॉ. भगवान हिर्डेकर यांनी विवेचन केले.

डॉ. रघुनाथ ढमाकले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. शिंदे यांच्या कार्याचा परिचय विशाखा जितकर यांनी, पाहुण्यांचा परिचय डॉ. जी. पी. माळी यांनी करून दिला. प्रकाशक सुरेश शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी ज्येष्ठ बालसाहित्यिक बाबुराव शिरसाट यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. रमेश जाधव, डॉ. सुभाष देसाई, प्रभाकर तांबट, सुहास राजेभोसले आदी उपस्थित होते. अश्विनी वागरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. राजेंद्र यादव यांनी आभार मानले.

14 JUL 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण, ऑनलाईन शिक्षण केंद्र अभ्यासक्रम प्रवेशास मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठीच्या विविध पदवी, पदव्युत्तर व ऑनलाईन अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस १० ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली. बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास), एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) या दूरशिक्षण अभ्यासक्रमांसह ऑनलाईन एम.बी.ए., एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरू आहेत. विविध कारणांमुळे नियमित शिक्षण घेता न आलेले विद्यार्थी, शिक्षण अर्धवट राहिलेले विद्यार्थी, नोकरी करणारे कर्मचारी, गृहिणी, उद्योजक, शेतकरी, सैनिक, कामगार तसेच बारावी उत्तीर्ण विद्यार्थी यांच्यासाठी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे अभ्यासक्रम एक उत्तम संधी आहे. केंद्राच्या ८९ अभ्यास केंद्रांमार्फत विद्यार्थ्यांना प्रवेशाची सुविधा उपलब्ध आहे.

14 JUL 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण, ऑनलाईन केंद्राच्या अभ्यासक्रम प्रवेशास मुदतवाढ

**जनप्रवास :** कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या विविध पदवी, पदव्युत्तर व ऑनलाईन अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिये १० ऑगस्ट पर्यंत मुदतवाढ दिल्याची माहिती प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली.

अंतर्गत बी. ए., बी. कॉम., एम. ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास), एम. कॉम. आणि एम. एस्सी. (गणित) या दूरशिक्षण अभ्यासक्रमांसह ऑनलाईन एम.बी.ए., एम. कॉम. आणि एम. एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरू आहेत.



डॉ. पाटील यांनी सांगितले की, विविध कारणांमुळे नियमित शिक्षण घेता न आलेले विद्यार्थी, शिक्षण अर्धवट राहिलेले विद्यार्थी, नोकरी करणारे कर्मचारी, गृहिणी, उद्योजक, शेतकरी, सैनिक, कामगार तसेच बारावी उत्तीर्ण विद्यार्थीसाठी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे अभ्यासक्रम एक उत्तम संधी उपलब्ध करून देतात. केंद्राच्या ८९ अभ्यासकेंद्रांमार्फत विद्यार्थ्यांना प्रवेशाची सुविधा उपलब्ध आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर https://www.unishivaji.ac.in प्रवेशासंदर्भातील सविस्तर माहिती उपलब्ध आहे. तसेच ऑनलाईन प्रवेश पोर्टलवर https://sukapps.unishivaji.ac.in/stud-reg जाऊन आपला प्रवेश निश्चित करू शकतात. नियमित महाविद्यालय किंवा मुक्त विद्यापीठामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनाही नियमानुसार दुहेरी पदवी घेण्याची संधी उपलब्ध आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या विविध अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन डॉ. पाटील यांनी केले आहे. इच्छुकांनी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयाशी किंवा अभ्यासकेंद्राशी संपर्क साधावा.

14 JUL 2026
सकाळ

# दूरशिक्षण, शिक्षण केंद्राच्या प्रवेशास मुदतवाढ

कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे विविध पदवी, पदव्युत्तर व ऑनलाईन अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस १० ऑगस्टपर्यंत मुदतवाढ दिली आहे. या अंतर्गत बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास), एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) या दूरशिक्षण अभ्यासक्रमांसह ऑनलाईन एम.बी.ए., एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरू आहेत. केंद्राच्या ८९ अभ्यासकेंद्रांतर्फे प्रवेशाची सुविधा आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने नियमित महाविद्यालय किंवा मुक्त विद्यापीठामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनाही नियमानुसार दुहेरी पदवी घेण्याची संधी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या विविध अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन माहिती प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले.

14 JUL 2026

सकाळ

# उपकुलसचिव निवास माने यांना पीएच.डी.



निवास माने

कोल्हापूर : विद्यापीठाचे उपकुलसचिव निवास संभाजी माने यांना 'उच्च शिक्षणातील संगणकीकरण' या विषयावर संशोधनासाठी विद्यापीठाने पीएच.डी. जाहीर केली. त्यांनी उच्च शिक्षण संस्थांमधील संगणकीकरण आणि ईआरपी प्रणालींच्या प्रभावी अंमलबजावणीवर संशोधन केले. माने यांनी वाणिज्य व व्यवस्थापन विभागांतर्गत व्यवस्थापनशास्त्र अंतर्गत विद्यापीठाला शोधप्रबंध सादर केला. कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. चिंतामणी काळे, केदार माहुलकर, परीक्षा संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

1 4 JUL 2026

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उज्ज्वल भविष्याची गुरुकिल्ली 'बायोटेक्नॉलॉजी'

**वैद्यकीय उपचार, शेतीचा विकास, अन्न प्रक्रिया उद्योग आणि ढासळत्या पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जैवतंत्रज्ञान म्हणजेच बायोटेक्नॉलॉजी हे क्षेत्र सध्या संपूर्ण जगासाठी एक वरदान ठरत आहे. जागतिक स्तरावर या क्षेत्राची मागणी झपाट्याने वाढत आहे. हे क्षेत्र अनेक संधींच अथांग दालन बनले आहे. बायोटेक्नॉलॉजी उज्ज्वल भविष्याची गुरुकिल्ली आहे. विज्ञानाची उत्तम जाण, संशोधनाची आवड व चिकाटीने जैवतंत्रज्ञान क्षेत्र जागतिक स्तरावर नाव व करिअर घडवणारा यशाचा महामार्ग ठरू शकते.**

कोविड—१९ च्या महासंकटाने संपूर्ण जगात हाहाकार माजला होता. संपुर्ण जनजीवन थांबले होते. अशा कठीण स्थितीत बायोटेक्नॉलॉजी क्षेत्राने संशोधनाची महत्त्वाची बाजू उचलली. जैवतंत्रज्ञानातील प्रगत संशोधनामुळेच कोविडच्या विषाणूवर मात करण्यासाठी कमी काळात प्रभावी लसींची निर्मिती करणे शक्य झाले. भारताने स्वदेशी तंत्रज्ञानावर विकसित केलेली 'कोव्हॅक्सिन' असो किंवा जागतिक स्तरावरील 'एमआरएनए' तंत्रज्ञानावर आधारित लसी, या सर्व शोधांमागे बायोटेक शास्त्रज्ञांची अहोरात्र मेहनत होती. केवळ लस निर्मितीच नव्हे, तर संसर्ग झालेल्या व्यक्तींचे अचूक निदान करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या 'आरटी-पीसीआर' चाचण्या आणि 'रॅपिड अँटीजेन टेस्ट किट्स' चे डिझायनिंग व मोठ्या प्रमाणावरील उत्पादन याच क्षेत्रातून झाले. भविष्यातील कोणत्याही जैविक युद्धाचा किंवा महामारीचा सामना करायचा असेल, तर बायोटेक्नॉलॉजीमधील गुंतवणूक वाढवणे अपरिहार्य आहे.



## बायोटेक्नॉलॉजीचे विस्तारीत क्षेत्र

वैद्यकीय क्षेत्र (Medical Biotechnology) : नवीन आणि अधिक प्रभावी जीवनसत्त्वे व प्रतिजैविकांची (Antibiotics) निर्मिती याद्वारे केली जाते.

कृषी क्षेत्र (Agricultural Biotechnology) : वाढत्या लोकसंख्येला अन्नाचा पुरवठा करण्यासाठी आणि बदलत्या हवामानात तग धरू शकतील अशा पिकांची निर्मिती जैवतंत्रज्ञानातून केली जाते. कीड-प्रतिरोधक पिके, कमी पाण्यात येणारी आणि जास्तीत जास्त पोषणमूल्य असणारी अन्नधान्ये यामुळे शेती क्षेत्रात मोठी क्रांती होत आहे.

### पर्यावरण संरक्षण (Environmental Biotechnology) :

वाढते प्रदूषण ही जगाची मोठी समस्या आहे. बायोटेक्नॉलॉजीच्या मदतीने रासायनिक सांडपाणी शुद्ध करणे, प्लास्टिक कचऱ्याचे नैसर्गिक विघटन करणारे जीवाणू तयार करणे व रासायनिक खतांना पर्याय म्हणून जैविक खतांचा वापर वाढवणे यावर मोठे काम सुरू आहे.

### अन्न प्रक्रिया उद्योग (Food Biotechnology) :

अन्नपदार्थ दीर्घकाळ टिकवणे, दुग्धजन्य पदार्थांचा दर्जा सुधारणे, बेकरी उत्पादनांमध्ये प्रगत यीस्ट आणि एन्झाईम्सचा वापर करून त्यांची पोषणमूल्ये वाढवणे यासाठी या तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो.

वैयक्तिकृत औषधोपचार आणि जीन थेरपी : भविष्यात सर्व रुग्णांना एकाच रोगासाठी एकच औषध देण्याची पद्धत कालबाह्य होणार आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जैवतंत्रज्ञान : माहिती तंत्रज्ञान (आयटी) आणि जैवतंत्रज्ञान (Biotech) एकत्र आल्या ने संशोधनात मोठी प्रगती झाली आहे.

## पदव्युत्तर शिक्षण आणि सखोल संशोधन :

उच्च स्तरावर संशोधनात आवड असणाऱ्यांसाठी एम एस्सी. बायोटेक्नॉलॉजी हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे.

प्रगत अभ्यासक्रम : या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमात जेनेटिक इंजिनिअरिंग, बायोइन्फॉर्मेटिक्स, मॉलिक्युलर बायोलॉजी, इम्युनॉलॉजी आणि नॅनो—बायोटेक्नॉलॉजी, यांसारख्या अतिप्रगत विषयांचे सखोल शिक्षण दिले जाते. एम.एस्सी. नंतर विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामांकित संस्थांमध्ये ज्युनिअर रिसर्च फ़ेलो म्हणून काम करता येते. तसेच परदेशात पीएचडी करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर स्कॉलरशिप्स उपलब्ध होतात.

## बायोटेक्नॉलॉजीची शैक्षणिक वाटचाल

बी.एस्सी. आणि एम.एस्सी. चे बदलते स्वरूप

बायोटेक्नॉलॉजी क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी बारावी विज्ञान (Science) शाखेनंतर प्रामुख्याने दोन महत्त्वाचे शैक्षणिक टप्पे उपलब्ध आहेत.

अप्रेंटिसशिप—एम्बेडेड डिग्री प्रोग्रॅम्स : हा पदवी अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्याला, पदवी अभ्यासक्रमांचाच एक अविभाज्य भाग म्हणून अप्रेंटिसशिप प्रशिक्षण घेण्यास सक्षम करतो. भारतातील उद्योग-शैक्षणिक संस्था सहकार्याला चालना देण्यासाठी, प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्यासाठी अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. बी. एस्सी. बायोटेक्नॉलॉजीचा पारंपरिक अभ्यासक्रम पूर्णपणे बदलण्यात आला आहे. विशेष म्हणजे, विद्यापीठाचा बी. एस्सी. बायोटेक्नॉलॉजी हा अभ्यासक्रम आता यूजीसीच्या नव्या धोरणानुसार 'अप्रेंटिसशिप-एम्बेडेड डिग्री प्रोग्राम' अंतर्गत राबवला जात आहे, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता पदवीच्या कालावधीतच नामांकित बायोटेक व फार्मा कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष काम करून विद्यावेतन मिळवण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.

• डॉ. सुषमा पाटील,
जैवतंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

- वैद्यकीय, कृषी, औषध निर्मिती, पर्यावरण, संशोधन, एआय क्षेत्रात संधी

- जागतिक स्तरावर विस्तारीत क्षेत्र

कौशल्यावर आधारित शिक्षण : पूर्वीच्या अभ्यासक्रमात पुस्तकी ज्ञानावर जास्त भर असायचा, मात्र एईडीपी अंतर्गत या कोर्सला 'रोजगाराभिमुख' बनवले आहे. या प्रोग्राममध्ये विद्यार्थ्यांना थेट बायोटेक आणि फार्मा कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष काम व उद्योग जगताशी थेट जोडणी करण्याची संधी मिळते.

अनिवार्य इंटर्नशिप आणि प्रोजेक्ट्स : पदवीच्या अंतिम वर्षात विद्यार्थ्यांना उद्योगांमध्ये प्रत्यक्ष प्रोजेक्ट्स करावे लागतात, ज्यामुळे पदवी पूर्ण होताच विद्यार्थ्यांना कॉलेज कॅम्पसमधूनच मोठ्या कंपन्यांमध्ये थेट नोकरीच्या संधी उपलब्ध होतात.

- **गुणवत्ता नियंत्रण अधिकारी** : औषध निर्मिती कंपन्यांमध्ये उत्पादनाचा दर्जा आंतरराष्ट्रीय मानकांनुसार तपासणे.
- **क्लिनिकल रिसर्च असोसिएट** : नवीन औषधांच्या मानवी चाचण्या व्यवस्थापित करणे आणि शासकीय नियमांचे पालन करून घेणे.
- **बायो-प्रोसेस इंजिनिअर** : मोठ्या कारखान्यांमध्ये किंवा फार्मा प्लांटमध्ये जैविक उत्पादनांची देखभाल.
- **करिअरच्या विविध संधी** : बायोटेक्नॉलॉजी पूर्ण केलेल्या उमेदवारांसाठी केवळ भारतातच नव्हे, तर अमेरिका, युरोप, जर्मनी आणि सिंगापूर यांसारख्या देशांमध्ये रोजगाराच्या प्रचंड संधी आहेत. या प्रमुख पदांवर काम करण्याची संधी
- **रिसर्च सायंटिस्ट** : फार्मा आणि बायोटेक कंपन्यांमध्ये नवीन औषधे आणि लसींच्या संशोधनाचे नेतृत्व करणे.
- **बायोइन्फॉर्मेटिक्स तज्ज्ञ** : कॉम्प्युटर सायन्स आणि जीवशास्त्राची सांगड घालून मानवी डीएनए आणि जनुकांचा विदा विश्लेषणाचे काम करणे. सध्या या पदाला आयटी क्षेत्रासारखेच मोठे पॅकेजेस मिळतात.